सत्यमेव जयते

मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य
अल्पसंख्याक विकास व वक्फ
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

# ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार सोहळा

सांस्कृतिक कार्य संचालनालय तर्फे आयोजित ज्ञानोबा तुकाराम पुरस्काराचे वितरण लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, पुणे येथे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. विनोद तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावर्षीचा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार डॉ. किसन महाराज साखरे यांना गतवर्षीचे मानकरी श्री. रामकृष्ण महाराज लहवितकर आणि फादर फ्रान्सिस दिब्रेटो यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीष बापट, पुणे महानगरपालिकेच्या महापौर मुक्ता टिळक, खासदार अनिल शिरोळे, आमदार माधुरी मिसाळ, आमदार योगेश टिळेकर, डॉ. विजय भटकर आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. विनोद तावडे म्हणाले की, महाराष्ट्राला संत महंतांची थोर परंपरा लाभली आहे. संत साहित्यामध्ये असलेली विज्ञाननिष्ठा, संत साहित्यामधील जाती व्यवस्थेवरील प्रहार, संत साहित्यामधील जीवनमुल्ये आणि संतांची सामाजिक समरसतेची शिकवण आजच्या युवा पिढीपर्यंत नेण्याची गरज आहे. तसेच संत साहित्यातील जीवनमुल्ये आचरणात उतरविण्याची आज काळाची गरज आहे, असे श्री. तावडे यांनी यावेळी सांगितले. किसन महाराज साखरे यांना मिळालेल्या पुरस्कारानंतर आपल्या मनोगतात किसन महाराज साखरे यांनी महाराष्ट्रातील शाळांमध्ये मराठी, इंग्रजी, हिंदी या भाषांबरोबरच संस्कृत भाषा ही शिकविण्याची आवश्यकता असल्याचा मनोदय व्यक्त केला व त्यासाठी त्यांना प्राप्त झालेल्या पुरस्काराच्या रक्कमेमध्ये एक लाखाचे योगदान आपल्यावतीने देत संस्कृत भाषेचा प्रसार आणि प्रचार अधिक प्रमाणत व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी शासनाकडे व्यक्त केली. आपल्या भाषणामध्ये किसन महाराज साखरे यांच्या मनोदयाचा उल्लेख करताना श्री. तावडे म्हणाले की, किसन महाराज साखरे यांनी व्यक्त केलेला मनोदयाच्या दृष्टीने राज्य सरकारने आधिच पाऊल टाकले आहे. महाराष्ट्रामध्ये नव्याने सुरु होणाऱ्या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळांच्या अभ्याक्रमांमधील शाळांमध्ये पहिल्या वर्गापासूनच अन्य भाषांसमवेत संस्कृत भाषेचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे किसन महाराज साखरे यांनी जी मदत घोषित केली आहे, त्या मदतीमध्ये माझे एक महिन्याचे वेतन त्याचबरोबर मंत्री गिरीष बापट यांचेही एक महिन्याचे वेतन या उपक्रमासाठी देण्यात येईल, असेही श्री. तावडे यांनी सांगितले.